# को.ए.सो. जनरल अरूणकुमार वैद्य माध्यमिक शाळा व इंडस्ट्रियल उच्च माध्यमिक शाळा, अलिबाग

अहवाल वर्षी उच्च माध्यमिक परीक्षा इ. १२ वी वाणिज्य शाखेचा निकाल ८०.०९% इतका लागला. त्यात कु.धरणकर भूषण जयवंत ८६.४६% तर कु.जैयस्वल रविकुमार बहाद्दूर ७९.३८% तर कु.गुप्ता गौतम जोखन ७७.७९% गुण मिळवून अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमरंक प्राप्त केला.

उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचा निकाल ९०.६२% इतका लागला असून त्यात कु. पाटील प्रितेश नंदकुमार याने ७६.२१% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. तर कु.पाटील श्रीनाथ पंढरीनाथ ७५.५४% तर कु.मळेकर सौरभ अनिरूद्ध याने ७०.००% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. शालांत परीक्षेचा निकाल ८६.०८% इतका लागला असून शाळेत कु.समेळ सागर विद्याधर ९४.००% तर कु.चव्हाण श्रीधर संदीप ९३.२०% तर कु.नाईक स्वराज प्रशांत ९२.२०% यांनी गुण मिळवून प्रथम, द्वितीय व तृतीय येण्याचा मान मिळवला.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्याकरिता शालेय उपक्रमाबरोबर सहशालेय उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्त्व समजून देण्यासाठी जलसाक्षरता दिन साजरा करण्यात आला. त्याचबरोबर आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक असतो या उद्देशानेच मा.श्री.वराडे साहेब व म्हात्रे साहेब पोलिस निरिक्षक अलिबाग यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व शिस्त याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

आमच्या शाळेचे पर्यवेक्षक मा.श्री.ए.बी.म्हात्रे सर यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याच्या गौरवार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार रायगड जिल्हा परिषद अलिबाग शिक्षण विभागाद्वारे प्रदान करण्यात आला. तसेच उच्च माध्यमिक विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री.जगदीश हरिश्चंद्र पाटील यांना संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल रायगड जिल्हा परिषदेतर्फे सन २०१५-१६ चा रायगड भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सन २०१५-१६ च्या को.ए.सो. आंतरशालेय वाक्स्पर्धेत एकूण आठ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये कु. चिन्मय मिलिंद धोदरे व कु. प्रितम भानुदास म्हात्रे इ.९ वी यांच्या प्रदूषण नियंत्रण चूल या प्रतिकृतीला दुसरा क्रमांक प्राप्त झाला तसेच ९ वी ते १२ वी च्या गटात प्रश्नमंजुषेत तिसरा क्रमांक मिळाला. महात्मा गांधी विद्यालय, हाशिवरे येथे झालेल्या शारदोत्सव गायन स्पर्धेमध्ये इ. ९ वी, १० वी च्या गटात ऋषिकेश मनिष भायदे यांस प्रथम क्रमांक अशी एकूण ५ बक्षिसे मिळाली.

एलिमेंटरी चित्रकला परीक्षेचा निकाल १००% तर इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल ९७% लागला. राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहनिमित्त जि.प.अलिबाग शिक्षण विभागाकडून घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत तालुकास्तरावर ५ वी ते ७ वी च्या गटात कु. हिमांशु शिरगावकर यांस प्रथम क्रमांक मिळाला.

चालू शैक्षणिक वर्ष मा.सभापती श्री. अजितभाई शाह, मा.मुख्याध्यापक श्री.एस.एस.वाघमारे, मा.पर्यवेक्षक श्री.ए.बी.म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व सेवकवृंदाच्या सहकार्याने शालेय कामकाज सुरू आहे.


कु. सगर समेळ विद्याधर
एस. एस.सी. (९४.००%)


कु. धरणकर भुषण जयवंत
एच. एस.सी.- कॉमर्स


कु. पाटील प्रितेश नंदकुमार
एच. एस.सी.- व्होकेशनल


श्री. पाटील जगदीश हरिश्चंद्र
रायगड भूषण पुरस्कार


श्री. म्हात्रे ए. बी.
आदर्श शिक्षक पुरस्कार



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी व्यासपिठावर उपस्थित मान्यवर मंडळी


विज्ञान प्रर्दशनाचे परीक्षण करताना मान्यावर मंडळी